## पावसात आतापर्यंत 5 जणांचा मृत्यू; सुरक्षेचा प्रश्न गंभीर

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश आणि आसपासच्या परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, गेल्या काही दिवसांत विविध दुर्घटनांमध्ये ६ जणांचा बळी गेला आहे. पावसाच्या जोडीला प्रशासकीय यंत्रणेचा ढिसाळ कारभार आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. जोगेश्वरी पूर्व येथील गोमती वैशाली चाळीत आगीमुळे पसरलेल्या विषारी धुरामुळे ७५ वर्षीय सलीम तडवी आणि ६७ वर्षीय मुमताज तडवी या दांपत्याचा मृत्यू झाला.

# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता


epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



**पाहिजेत**

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.com वर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.
कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.



छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. ०४ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## थोडक्यात वार्ता

### छावणी उड्डाणपुलावर बसचा अपघात ; 35 प्रवासी जखमी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर ते वाळूज मार्गावरील छावणी उड्डाणपुलावर रात्री ११.३० वाजता एका खासगी कंपनीच्या बसचा भीषण अपघात झाला. अपघात झाला त्यावेळी बसमध्ये एका कंपनीचे ३५ कर्मचारी प्रवास करत होते. दुसऱ्या शिफ्टनंतर कंपनीतील कामगारांना घरी घेऊन जाणारी ही खासगी बस उड्डाणपुलावर उभ्या असलेल्या ऊसाने भरलेल्या ट्रॉलीवर जोरात धडकली.या अपघातात बस चालक जाधव यांचा मृत्यू झाला असून जवळपास 35 कामगार गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की चालक बसच्या केबिनमध्ये अडकला होता. नागरिकांच्या मदतीने बस चालकाला बाहेर काढण्यात आले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी आणि मदत पथकांनी तत्काळ बचावकार्य सुरू करून सर्व जखमींना विविध खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल केले. काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. बसमधील प्रवासी वाळूज एमआयडीसीतील गरवारे कंपनीचे कामगार होते,अशी माहिती काही कामगारांनी दिली.अपघात प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

### आंबेनळी घाट सहा जुलैपर्यंत वाहनांसाठी बंद

**अलिबाग :** आंबेनळी घाट हा भूस्खलन, दरड कोसळणे आणि दगड घसरण्याच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असून ही बाब लक्षात घेऊन रायगडच जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी महत्वाची वाहतूक अधिसूचना जारी केली आहे. त्यानुसार ३ ते ६ जुलैदरम्यान आंबेनळी घाट सर्व प्रकारच्या वाहनांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच यापुढे रायगड जिल्ह्यासाठी भारतीय हवामान विभागाकडून (India Meteorological Department) ऑरेंज किंवा रेड अलर्ट जारी झाल्यास घाटातील हलक्या वाहनांची वाहतूकही पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. या शिवाय पावसाळ्यात रात्रीच्या वेळेतही या मार्गावरील सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध लागू राहतील. प्रशासनाने वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

### ऑगस्टपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (ST) सवलतीच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व प्रवाशांसाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC)अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे 'लाडकी बहीण' योजनेतील महिलांसह सर्व सवलतधारक प्रवाशांनी पुढील २८ दिवसांत स्मार्ट कार्ड काढणे आवश्यक असून, १ ऑगस्टपासून एनसीएमसी कार्डशिवाय सवलतीच्या दरात प्रवास करता येणार नाही. एसटीचा प्रवास अधिक स्मार्ट, डिजिटल आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. एनसीएमसी कार्डमुळे तिकीट वितरणाची प्रक्रिया जलद होणार असून, रोख व्यवहारातही घट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. महामंडळाने कार्ड नोंदणी प्रक्रिया सुलभ केली असून, अर्ज केल्यानंतर सुमारे ३० दिवसांत लाभार्थ्यांना स्मार्ट कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यानंतर कार्ड ऑनलाइन रिचार्ज करून वापरता येणार असल्याने प्रवाशांना अधिक सुविधा मिळणार आहेत. महामंडळाच्या माहितीनुसार, सोलापूर शहर व जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे २ लाख ८९ हजार ३७१ प्रवाशांना एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच विविध सवलत योजनांतील लाभार्थ्यांना या डिजिटल प्रणालीचा लाभ मिळणार आहे.

## 'जैश-ए-मोहम्मद'च्या आठ संशयित दहशतवाद्यांना अटक!; एकूण सोळा संशयित गजाआड, राजधानीवरील हल्ल्याचा कट उधळला



**गुजरात :** देशाची सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाली असून, गुजरात एटीएस आणि दिल्ली पोलिसांनी संयुक्तपणे केलेल्या धडाकेबाज कारवायांमध्ये विविध दहशतवादी संघटनांशी संबंधित एकूण सोळा संशयितांना अटक करण्यात आली आहे. या कारवायांमुळे दहशतवाद्यांचे देशविरोधी कारस्थान उधळले असून मोठा अनर्थ टळला आहे.


बंदी घातलेल्या 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेचे नेटवर्क देशात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आठ संशयितांना गुजरात आणि मध्य प्रदेशातून अटक करण्यात आली आहे. या सर्व संशयितांवर यूएपीए अंतर्गत अत्यंत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुजरात एटीएसला अलीकडच्या काळात मोठे यश मिळाले असून, यापूर्वी त्यांनी 'आयएसआयएस' प्रेरित दोन आणि बनावट नोटांच्या रॅकेटमध्ये गुंतलेल्या व 'अल-कायदा'शी संबंधित चार दहशतवाद्यांना आधीच गजाआड केले आहे. हे सर्व आरोपी कट्टरपंथी मजकूर पसरवून सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांची दिशाभूल करण्याचे काम करत होते.

दुसरीकडे, दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने एका मोठ्या आंतरराज्यीय कारवाईत पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय' (ISI) समर्थित एका मोठ्या दहशतवादी आणि शस्त्रास्त्र तस्करीच्या नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. पंजाब आणि दिल्लीतून अटक केलेल्या शुभदीप सिंग, गुरजंत सिंग, साजन सिंग आणि गगनप्रीत या चार संशयितांना दिल्लीतील प्रमुख धार्मिक स्थळे आणि पोलीस मुख्यालयांची 'रेकी' करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. हे आरोपी थेट पाकिस्तानमधील हँडलर्सच्या संपर्कात होते आणि त्यांच्याच सांगण्यावरून देशाच्या राजधानीवर मोठा हल्ला करण्याचा कट रचत होते.

अटक करण्यात आलेल्या या दहशतवाद्यांकडून तुर्की बनावटीच्या झिगाना पिस्तुलासह दोन परदेशी बनावटीची पिस्तूलं, नऊ जिवंत काडतुसे आणि पाच मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. सुरक्षा यंत्रणांनी सलग केलेल्या या मोठ्या कारवायांमुळे दहशतवादी संघटनांच्या देशविरोधी मनसुब्यांना मोठा धक्का बसला आहे. या संपूर्ण प्रकरणांचे धागेदोरे शोधण्यासाठी आणि पुढील कट उघडकीस आणण्यासाठी सुरक्षा यंत्रणांकडून आता अधिक तपास केला जात आहे.

## पुणे जिल्ह्यातील नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची सुवर्णसंधी

### दरमहा मिळणार नऊ हजार रुपयांचे विद्यावेतन



**प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना तिसऱ्या टप्प्यात तरुणांसाठी मोठी संधी**

- केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत देशभरात ३१,४८० हून अधिक जागांवर इंटर्नशिपची संधी उपलब्ध झाली आहे.
- १८ ते २५ वर्षे वयोगटातील १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा आणि पदवीधारक उमेदवारांना ६ ते ९ महिन्यांच्या कालावधीसाठी दरमहा ९,००० रुपये विद्यावेतन दिले जाईल.
- पुणे जिल्ह्यातील जेसीबी इंडिया, टेक महिंद्रा, एचडीएफसी बँक आणि स्कोडा ऑटो यांसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये तरुणांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे.
- नियमित शिक्षण घेणारे किंवा पूर्णवेळ नोकरीत असणारे उमेदवार अपात्र असून, दूरस्थ शिक्षण घेणाऱ्या तरुणांना अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे.
- पात्र उमेदवारांनी वेळेत pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी किंवा पुण्याच्या रास्ता पेठ येथील जिल्हा कौशल्य विकास केंद्राशी संपर्क साधावा.

**पुणे :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (PMIS) २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरात ३१,४८० पेक्षा अधिक इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

योजनेंतर्गत उमेदवारांची पात्रता वय १८ ते २५ वर्षे, भारतीय नागरिकत्व आवश्यक, किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. पूर्णवेळ नोकरी किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र असतील. जे उमेदवार ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेत आहे ते उमेदवार पात्र आहेत. इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने असून दरमहा रु. ९,०००/- विद्यावेतन दिले जाणार आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल.

PMIS या योजनेमध्ये पुणे जिल्हयामधील जेसीबी इंडिया लिमि. (120), क्वीज कार्पो लिमी. (50), बेलराईस इंङ लिमी. (20), स्कोडा ऑटो व्होल्क्सवॅगन इ. प्रा. लि. (1), चोलमंडलम इन्वेस्टेमेंट आणि फायनान्स कं. लि. (15), बर्जर पेन्टस् इंडिया लि. (14), एमक्युर फार्मासूटीकल्स लि. (5), एचडीएफसी बँक लि. (22), एच. जी. इन्फ्रा इंजिनिअरिंग लि. (PART XI) (4), हनीवेल टेक्नॉलॉजी सोल्युशन्स लॅब प्रा. लि. (7), जे.के. सिमेंट लि. (4), टेक महिंद्रा लि. (20), द इंडियन हॉटेल्स कं. लि. (6) ई. नामांकित कंपनीमध्ये रिक्तपदांसाठी उमेदवारांना इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध आहे. तरी या कंपनीमध्ये अ‍ॅप्लाय करण्यासाठी मर्यादित कालावधी असल्यामुळे pminternship.mca.gov.in या पोर्टलवर जाऊन नादणी करुन रिक्तपदाना अर्ज करावा व या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ पुणे या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. ०२०-२६,१३३६०६, वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

## ॲट्रॉसिटी' गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा- देवेंद्र फडणवीस

### राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समिती बैठक



**मुंबई:** अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात 'ॲट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटीचे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून ॲट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांमध्ये प्रकर्षाने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर प्रशिक्षण घेण्यात यावीत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## उघड्यावर मांस विक्री करणाऱ्या 12 दुकानांवर कारवाई गंगापूर आणि लासूर स्टेशन येथील 6 विनापरवाना दुकाने सील



हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गंगापूर आणि लासूर स्टेशन येथे उघड्यावर तसेच विनापरवाना मांस विक्री करणाऱ्या १२ दुकानांवर अन्न व औषध प्रशासन विभागाने गुरुवारी मोठी कारवाई केली. या धडक मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६ दुकानांना जागेवरच सील ठोकण्यात आले आहे. सहआयुक्त श्रीकांत करकळे आणि सहायक आयुक्त दयानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे, प्रशांत अजिंठेकर, संबंधित कर्मचारी, स्थानिक प्रशासन व आरोग्य विभागाच्या संयुक्त पथकाने ही तपासणी मोहीम राबवली. पथकाने गुरुवारी गंगापूर येथील ८ आणि लासूर स्टेशन येथील ४ अशा एकूण १२ मांस विक्रीच्या दुकानांची अचानक तपासणी केली. या तपासणी दरम्यान गंगापूर येथे विनापरवाना मांसविक्री करणारी ५ दुकाने आणि लासूर स्टेशन येथील १ दुकान अशी एकूण ६ दुकाने बेकायदेशीरपणे चालवली जात असल्याचे उघडकीस आले. पथकाने तातडीने कारवाई करत या ६ दुकानांना सील लावले. स्थानिक प्रशासनाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) असल्याशिवाय अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना मिळणार नाही, अशा स्पष्ट सूचना या वेळी पथकातील अधिकाऱ्यांनी संबंधित दुकानदारांना दिल्या. या कारवाईमुळे परिसरात विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## आता दुधात भेसळ करणारे रडारवर; नवी कडक नियमावली जाहीर!

### एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची घोषणा; नियम न पाळल्यास थेट परवाने रद्द करण्याचा दिला इशारा

**मुंबई :** "आता दुधात भेसळ करणारे रडारवर" या अन्न आणि औषध प्रशासनाच्या (FDA) अधिकृत घोषणेनुसार, हॉटेल व्यावसायिक, बेकरी आणि पनीर विक्रेत्यांनंतर आता राज्याचे एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा दूध सम्राटांकडे वळवला आहे. "ग्राहकांच्या ताटापर्यंत शुद्ध आणि सुरक्षित दूध पोहोचणे हा त्यांचा कायदेशीर हक्क आहे. त्यामुळे दुधातील भेसळ आणि कृत्रिम दुधाचा काळाबाजार मुळापासून उपटून टाकण्यासाठी प्रशासनाने संपूर्ण पुरवठा साखळीसाठी कठोर नियमावली जाहीर केली आहे. 'फार्म टू प्लेट' या तत्त्वानुसार दूध संकलन केंद्रापासून ते अगदी किरकोळ विक्रेत्यांपर्यंत सर्वांना या नियमांचे पालन करावे लागेल; अन्यथा परवाने रद्द केले जातील," असा कडक इशारा तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेत दिला. या मोहिमेसाठी प्रशासनाने 'सेव्ह फूड, सेव्ह ड्रग' ही विशेष राज्यव्यापी मोहीम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांत हॉटेल आणि बेकरी व्यवसायात आपल्या कारवाईचा धाक दाखवल्यानंतर मुंढे यांनी आता दूध क्षेत्रातील गैरव्यवहारांवर 'सर्जिकल स्ट्राईक' केला आहे. राज्यभर करण्यात आलेल्या तपासण्या आणि नमुन्यांच्या विश्लेषणातून दूध पुरवठा साखळीमध्ये काही अत्यंत गंभीर त्रुटी सातत्याने समोर आल्यानंतर हा सर्वंकष अनुपालन आदेश जारी करण्यात आला आहे. याविषयी बोलताना मुंढे म्हणाले की, "हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या तपासणीदरम्यान असे आढळून आले की, अनेक जण पेस्ट कंट्रोल केल्याचे सर्टिफिकेट दाखवतात, मात्र प्रत्यक्षात तिथे पेस्ट कंट्रोल केलेले नसते. अशा बोगसगिरी करणाऱ्या हॉटेल्सचे लायसन्स आम्ही तात्काळ रद्द केले आहे. त्यामुळे मला कागदी घोडे नकोत, प्रत्यक्ष काम न दिसल्यास दुकान किंवा व्यवसाय बंद पाडला जाईल," अशा कडक शब्दांत त्यांनी मुजोर व्यावसायिकांना सुनावले.

एफडीएने केलेल्या निरीक्षणात दूध व्यवसायात काही अत्यंत गंभीर गैरप्रकार उघडकीस आले आहेत. त्यानुसार, दुधामध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची भेसळ करणे, तसेच युरिया, डिटर्जंट, कॉस्टिक सोडा, स्टार्च, ग्लुकोज आणि 'मेलामाइन' यांसारख्या घातक रसायनांचा वापर करून कृत्रिम (सिंथेटिक) दूध तयार केले जात असल्याचे समोर आले आहे. याशिवाय 'मिल्क फॅट' आणि 'एसएनएफ'च्या कायदेशीर मानकांचे उल्लंघन करणे, दूध टिकवण्यासाठी आवश्यक असलेल्या शीतसाखळीचे (कोल्ड चेन) पालन न करणे, विनापरवाना किंवा विनानोंदणी बेकायदेशीरपणे व्यवसाय करणे आणि चुकीचे लेबलिंग करून ग्राहकांची दिशाभूल करणे, असे धक्कादायक प्रकार उघड झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर आयुक्त मुंढे यांनी दूध उत्पादक आणि वितरकांची बैठक घेऊन त्यांच्यासमोर सादरीकरण केले. "आपल्या आहारात दूध हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे

## "खरं की काय"




## काम सुरु... पण नियोजन शून्य! : एमजीएम ते अरिहंत होंडा (जालना रोड) सर्व्हिस रोड पूर्ण बंद

### रस्त्यावरच मातीचा ढिगारा, बाजूलाच १२ फूट खोल खड्डा

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर






**छत्रपती संभाजीनगर :** एमजीएम चौकातून अरिहंत होंडा (जालना रोड) कडे जाणारा महत्त्वाचा सर्व्हिस रोड ड्रेनेज लाईनच्या कामामुळे पूर्णपणे बंद करण्यात आला असून, या कामाच्या नियोजनावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. खोदकामातून निघालेली माती थेट रस्त्यावर टाकण्यात आल्याने संपूर्ण मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला आहे. परिणामी, दररोज या मार्गाचा वापर करणाऱ्या शेकडो वाहनचालक, रुग्णालयात ये-जा करणारे नागरिक आणि स्थानिक रहिवाशांना मोठा वळसा घालून पर्यायी मार्गाचा वापर करावा लागत आहे.

या कामासाठी रस्त्याच्या कडेला सुमारे १२ फूट खोल खड्डा खोदण्यात आला आहे. मात्र, या खड्ड्याभोवती आवश्यक त्या प्रमाणात सुरक्षित बॅरिकेट्स, रात्री सहज दिसतील असे फ्लॅशिंग वॉर्निंग लाईट्स, रिफ्लेक्टर किंवा अन्य सुरक्षा साधनांची व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे कामाच्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षेबाबत गंभीर दुर्लक्ष झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, महानगरपालिकेने "ड्रेनेजचे काम सुरू असल्यामुळे रस्ता बंद आहे" असा सूचना फलक लावला असला, तरी रस्ता बंद केल्यानंतर वाहतुकीचे नियोजन कसे करायचे, पर्यायी मार्ग कोणता आहे, याची कोणतीही स्पष्ट माहिती नागरिकांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे अनेक वाहनचालक या मार्गावर येतात आणि रस्ता बंद असल्याचे लक्षात आल्यानंतर पुन्हा मागे फिरून दुसऱ्या मार्गाने जावे लागते. यामुळे वेळ, इंधन आणि श्रम यांचा अतिरिक्त भार नागरिकांवर पडत आहे.

एमजीएम रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, शैक्षणिक संस्था तसेच अनेक व्यावसायिक आस्थापनांकडे जाण्यासाठी हा सर्व्हिस रोड महत्त्वाचा मानला जातो. रस्ता बंद असल्याने रुग्णांचे नातेवाईक, विद्यार्थी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. पावसामुळे परिसरात चिखल आणि पाणी साचत असल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली असून कामाच्या ठिकाणी अपघाताचा धोका वाढला आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की विकासकामे आवश्यक आहेत; मात्र ती करताना नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतुकीचे नियोजन याकडे दुर्लक्ष होता कामा नये. रस्ता बंद करण्यापूर्वी पर्यायी मार्गाची स्पष्ट व्यवस्था, सुरक्षित बॅरिकेट्स, इशारा दिवे आणि वाहतूक नियंत्रणासाठी कर्मचारी नियुक्त करणे ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे. मात्र या ठिकाणी त्याचा अभाव स्पष्टपणे जाणवत आहे.


नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे तातडीने कामाच्या ठिकाणी मजबूत बॅरिकेट्स लावावे, रात्री दिसतील अशी प्रकाशयोजना करावी, पर्यायी मार्गाचे दिशादर्शक फलक लावावेत आणि काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करून हा महत्त्वाचा सर्व्हिस रोड वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी केली आहे.

# संपादकीय

## संरक्षण सिद्धतेतील आत्मनिर्भरतेची 'महाझेप'

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या (DAC) बैठकीत संरक्षण दलांच्या विविध खरेदी प्रस्तावांसाठी सुमारे ५२,००० कोटी रुपयांच्या 'आवश्यकतेच्या मंजुरीला' (AoN) दिलेली प्रशासकीय मंजुरी हे भारताच्या सामरिक आणि लष्करी इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि दूरगामी पाऊल आहे. आज जागतिक पातळीवर भू-राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असून, ड्रोन युद्ध आणि इलेक्ट्रॉनिक वॉरफेअरचे नवे तंत्रज्ञान रणांगणाची परिभाषा बदलत आहे. अशा आव्हानात्मक काळात भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाला आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज करणे ही काळाची गरज बनली होती. केंद्र सरकारने जाहीर केलेला हा ५२,००० कोटी रुपयांचा निधी केवळ शस्त्रखरेदी पुरता मर्यादित नसून, तो देशाच्या सीमा अधिक सुरक्षित आणि अभेद्य राखण्याच्या संकल्पनेला बळ देणारा आहे. या भव्य संरक्षण आराखड्यात भारतीय लष्कराच्या आधुनिकीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. रणांगणावर आधुनिक काळातील सर्वात मोठे आव्हान बनलेल्या ड्रोन हल्ल्यांचा सामना करण्यासाठी अँटी-अनमॅन्ड एरियल व्हेईकल (UAV) इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सिस्टम 'आकाश तरंग'ची खरेदी लष्कराच्या तुकड्यांना प्रभावी संरक्षण प्रदान करेल. यासोबतच शत्रूच्या यांत्रिक आव्हानांचा सामना करण्यासाठी मॅन पोर्टेबल अँटी-टँक गाइडेड मिसाइल (MPATGM) यंत्रणा पायदळाची क्षमता अधिक मजबूत करेल. मध्यम पल्ल्याचे हवाई संरक्षण देणारी 'एमआरएसएएम' (MRSAM) वेपन सिस्टम आणि मल्टि-स्पेक्ट्रल सेन्सिंग असलेले 'व्ही-शोराड्स' (V-SHORADS) यंत्रणा यामुळे भारतीय लष्कराची हवाई धोक्यांविरोधातील प्रत्युत्तर देण्याची लवचिकता आणि परिणामकारकता कमालीची वाढणार आहे. रणगाड्यांसाठी घेतलेली ॲक्टिव्ह प्रोटेक्शन सिस्टम आणि अधिक संहारकक्षम असणारी जेट-आधारित कामिकाझे ड्रोन सिस्टीम यामुळे भारतीय लष्कराची रणांगणावरील मारक क्षमता अधिक अचूक आणि घातक बनेल, यात शंका नाही. केवळ भूदलच नव्हे, तर हिंदी महासागरात वाढत्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भारतीय नौदलाला आणि हवाई दलालाही या मोहिमेत महत्त्वपूर्ण बळ मिळाले आहे. नौदलासाठी मंजूर करण्यात आलेली 'मल्टी इन्फ्लुएन्स ग्राउंड माइन' (MIGM) यंत्रणा शत्रूच्या सागरी हालचालींवर मर्यादा आणेल, तर प्रगत सेन्सर्सनी सज्ज असलेली 'नेव्हल शिपबॉर्न अनमॅन्ड एरियल सिस्टम' (NSUAS) नौदलाच्या सभोवतालच्या परिस्थितीबाबतच्या दक्षतेत मोठी वाढ करेल. जहाजांसाठी लागणाऱ्या मोटर्स आणि प्रोपल्शन यंत्रणांच्या चाचणीसाठी उभारण्यात येणारी 'लँड बेस्ड टेस्टिंग फॅसिलिटी' (LBTF) नौदलाला स्वावलंबी बनवण्यासाठी उपयुक्त ठरेल. हवाई दलासाठी मंजूर करण्यात आलेली 'फिक्स्ड-विंग बेस्ड हाय अल्टिट्यूड सुडो सॅटेलाइट' (FW-HAPS) ही अत्यंत प्रगत यंत्रणा सातत्यपूर्ण गोपनीय माहिती गोळा करणे, पाळत ठेवणे, दूरसंचार तसेच रिमोट सेन्सिंगची कामे अहोरात्र करेल, ज्यामुळे हवाई दलाची नजर अधिक तीक्ष्ण होईल. या संपूर्ण खरेदी प्रक्रियेचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वाचे अंग म्हणजे 'आत्मनिर्भर भारत' या धोरणाला मिळणारी गती होय. भारत आता केवळ परकीय शस्त्रास्त्रांवर अवलंबून न राहता स्वतःचे प्रगत तंत्रज्ञान विकसित करत आहे, हे या प्रस्तावांवरून स्पष्ट होते. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची ही निर्मिती आणि खरेदी देशांतर्गत संरक्षण उद्योगाला मोठी चालना देणारी ठरेल. या महाअधिग्रहण मोहिमेमुळे भारतीय सशस्त्र दले आधुनिक युद्धाच्या सर्व आघाड्यांवर शत्रूला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज होतील. तंत्रज्ञान आणि स्वदेशी निर्मितीचा हा मिलाफ भारताला जागतिक पातळीवर एक महाशक्ती म्हणून प्रस्थापित करण्याच्या दिशेने टाकलेले एक आश्वासक पाऊल आहे.

## छत्रपती संभाजी नगर-जालना गाडीचा 'गुरु' आज उतरला...



आज माझे प्रवासाचे संगती, *विलास शेकुजी पाटील*, *30 वर्षे 5 महिने 29 दिवस* स्वामी विवेकानंद शाळेत मराठी शिकवून सेवानिवृत्त झाले.

पण आमच्यासाठी ते 'सर' नव्हते. ते *छत्रपती संभाजी नगर ते जालना* या रोजच्या प्रवासातले आमचे वडीलधाते मित्र होते.

या मार्गावरचा ते सगळ्यात वेगळे व्यक्तिमत्व. डब्यात पत्ते, जुगार, व्यसन... काही आलं तरी विलासभाऊ त्याच्या वाटेला कधी गेले नाही. उलट, नवीन पोरगा सिगारेट ओढताना दिसला, तंबाखू खात असेल तर शांतपणे बाजूला नेऊन समजावणार. "प्रवासात वेळ घालवायचा तर पुस्तक वाच, गप्पा मार, पण वाईट सवय लावून घेऊ नकोस" हे त्यांचं ठरलेलं वाक्य.

ते फक्त स्वतःपुरता नव्हते. डब्यात जो येईल त्याला सोबत घेऊन चालायचे. कुणाला स्टेशन माहीत नाही तर उतरवायला मदत करणार, आणि संघटनेच्या कामात सगळ्यांना पुढे करून स्वतः मागे राहणार. रेल्वेत आम्हाला सर्वांना जालन्यावरून काहीतरी खायला आणायचे. कधीही कोणाचं वाईट चिंतायचे नाही.

वर्गात मराठीचा तास घेणारा मास्तर, गाडीत आम्हाला जगण्याचा तास देणारा. त्याच्यामुळं *संभाजीनगर-जालना* हा प्रवास फक्त अंतर नव्हतं, तो एक संस्कारवर्ग होता.

आजपासून खिडकीजवळची ती जागा रिकामी असेल. सकाळचा तो 'नमस्कार' मिस होईल. पण भाऊ, तुम्ही जे शिकलं ते आम्ही विसरणार नाही.

निवृत्ती झाली, पण तुमची संगत नाही. घरी या, चहा घेऊ. आता प्रवास निवांत करू... फक्त वेळेचं बंधन नाही.

नव्या वाटचालीसाठी खूप शुभेच्छा विलासभाऊ पाटील सर. तुमच्यासारखा माणूस प्रवासात भेटणं म्हणजे आयुष्याची लॉटरी लागणं.

सर आपणांस वाढदिवसाच्या आणि सेवापूर्तीच्या हार्दिक शुभेच्छा

**- डॉ. प्रविण खरात, सेलू.**

# कृषि तंत्रज्ञान विकासाला मोठी चालना. कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

**हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी**

**परभणी:** येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA), नवी दिल्ली यांनी विद्यापीठातील नाहेप–डीएफएसआरडीए (NAHEP–DFSRDA) सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत सुरू होणाऱ्या दुसऱ्या रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन (RPTO – Remote Pilot Training Organization) ड्रोन प्रशिक्षण केंद्रास सन २०३६ पर्यंत अधिकृत मान्यता प्रदान केली आहे.

विद्यापीठातील हे दुसरे अधिकृत ड्रोन प्रशिक्षण केंद्र असून, यापूर्वीचे केंद्र कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत आहे. त्यामुळे आता विद्यापीठात अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण अभ्यासक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ड्रोन नियम, २०२१ मधील नियम ३९ अंतर्गत जारी करण्यात आलेल्या Certificate of Authorization नुसार या केंद्रास रोटरक्राफ्ट–RPAS प्रकारातील स्मॉल व मीडियम वर्गाच्या ड्रोनसाठी VLOS (Visual Line of Sight) अंतर्गत दिवस व रात्र प्रशिक्षण देण्यास मान्यता मिळाली आहे.

या प्रमाणपत्राचा तपशील RPTO Authorization No. - RPTO202600120, मंजुरी दिनांक - २३ जून २०२६ वैधता कालावधी, २३ जून २०२६ ते २२ जून २०३६ असा आहे. ही मान्यता नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचे सहसंचालक श्री. मनीष कुमार यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आली आहे.

विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षण, संशोधन व कौशल्य विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, ही मान्यता त्या प्रयत्नांचे महत्त्वपूर्ण फलित मानली जात आहे. या मान्यतेमुळे विद्यार्थी, संशोधक, शेतकरी युवक तसेच कृषि उद्योजकांना अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण घेऊन आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्रातील नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठांमध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने महत्त्वाचे स्थान प्राप्त केले असून, मराठवाडा विभागाच्या कृषि तंत्रज्ञान विकासाला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

सध्या कृषि क्षेत्रात ड्रोनचा वापर पीक संरक्षण फवारणी, खत व्यवस्थापन, सर्वेक्षण, पीक निरीक्षण, नकाशांकन तसेच अचूक शेती (Precision Farming) यासाठी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाला प्राप्त झालेली ही मान्यता मराठवाडा तसेच राज्यातील कृषि शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकासासाठी ऐतिहासिक ठरणार आहे.

या केंद्राचे अकाउंटेबल मॅनेजर (Accountable Manager) म्हणून नाहेप–डीएफएसआरडीए सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख प्रा. (डॉ.) गोपाल शिंदे हे कार्यभार सांभाळणार आहेत.

प्रा. (डॉ.) गोपाल शिंदे नमूद केले की, नाहेप–डीएफएसआरडीए हा भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR), जागतिक बँक आणि भारत सरकार यांच्या अर्थसहाय्याने राबविण्यात आलेला प्रकल्प असून, सन २०१९ ते २०२३ या कालावधीत विविध उद्दिष्टे यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. या प्रकल्पांतर्गत १५,००० हून अधिक शेतकरी, विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांना प्रशिक्षण, संशोधन व लघु प्रकल्पांसाठी सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले असून, विद्यापीठाच्या तांत्रिक गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाली आहे. या केंद्राने एग्रीबॉट, एग्रीड्रोन, एग्री-एजीव्ही, सेन्सर प्रणाली, इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT), कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग (ML), डीप लर्निंग आणि डेटा सायन्स या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. राज्य, देश व विदेशातील ५५ हून अधिक संशोधक विद्यार्थ्यांनी येथे १ ते ३ महिन्यांच्या कालावधीत संशोधन व प्रशिक्षण पूर्ण केले असून, त्यांच्या माध्यमातून १५० हून अधिक संशोधन प्रबंध व पुस्तके प्रकाशित झाली आहेत. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांसह जागतिक स्तरावरील संशोधन समित्या, परिषद व कार्यशाळांमध्ये नेतृत्व करत या केंद्राने विद्यापीठाचा गौरव वाढविला आहे.

तसेच ते पुढे म्हणाले की, विद्यापीठाने भारतातील पहिले १८० दिवसीय कृषि ड्रोन प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला असून, आतापर्यंत झालेल्या दोन बॅचमध्ये १०० टक्के प्लेसमेंट साध्य झाले आहे. सध्या तिसरी बॅच सुरू होत आहे. सन २०३६ पर्यंतच्या नियम व अटींच्या अधीन राहून हे केंद्र कार्यरत राहण्यास मान्यता मिळाल्यामुळे विद्यापीठाच्या प्रशिक्षण क्षमतेत मोठी वाढ होणार आहे.

या केंद्राच्या उभारणीस आरपी ड्रोन लिमिटेड यांनी सहभाग नोंदवून शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच डीडीजी श्री. विनय चौरसिया व श्री. सुरेंद्र पंडिता यांनी प्रत्यक्ष तपासणी करून मान्यतेची शिफारस केली असून, सहसंचालक श्री. मनीष कुमार यांनी विद्यापीठास शुभेच्छा दिल्या आहेत.

भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR), नवी दिल्ली यांनीदेखील या केंद्राच्या स्थापनेबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू, शिक्षण संचालक, संशोधन संचालक, विस्तार शिक्षण संचालक, कुलसचिव, विद्यापीठ नियंत्रक, विद्यापीठ अभियंता तसेच सर्व अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतल्यामुळे हे यश संपादन झाले.

या यशाबद्दल शिक्षण संचालक, संशोधन संचालक, विस्तार शिक्षण संचालक, कुलसचिव, विद्यापीठ नियंत्रक, विद्यापीठ अभियंता, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक व कर्मचारी यांनी तसेच डिजिटल एक्स्टेंशन तज्ज्ञ डॉ. प्रवीण कापसे आणि डॉ. शंकर पुरी यांनी प्रा. (डॉ.) गोपाल शिंदे व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचा, अचूक मतदारयादीसाठी सर्वांनी सहकार्य करा"

### सोस येथे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या उपस्थितीत एसआयआर प्रगणना फॉर्म वाटप व जनजागृती अभियान



**जिंतूर प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिंतूर तालुक्यातील सोस येथे जनजागृती सभा व प्रगणना फॉर्म वाटप कार्यक्रम दिनांक 3 जुलै रोजी दुपारी 3 वाजता उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नागरिकांनी मतदारयादी अचूक,अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले.

यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी लाहोटी म्हणाले की, विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमादरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) प्रत्येक मतदाराच्या घरी भेट देऊन प्रगणना फॉर्मचे वितरण करणार आहेत.नागरिकांनी हा फॉर्म काळजीपूर्वक भरून त्यातील माहितीची खात्री करावी.आवश्यक असल्यास मागविण्यात आलेली कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे.मतदारयादीतील प्रत्येक माहिती अचूक राहणे ही लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी प्रत्येक नागरिकाने स्वतःपुरते मर्यादित न राहता आपल्या कुटुंबातील सदस्य,नातेवाईक,शेजारी व मित्रपरिवार यांनाही या अभियानाबाबत जागरूक करण्याचे आवाहन केले. मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी,पत्रकार,राजकीय पक्षांचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (BLA), शासकीय अधिकारी,तलाठी,ग्रामपंचायत अधिकारी,पोलीस पाटील, मुख्याध्यापक,शिक्षक तसेच गावपातळीवरील सर्व यंत्रणांनी पुढाकार घेऊन जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाचे जिंतूर तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस पाटील सोमेश्वर उदावंत,महसूल सहाय्यक योगेश शिंदे, दैवशाला तुरे,अशोक पाटील,खमर शेख, भगवान पाटील,यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच माणिक शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी (सेलू), नायब तहसीलदार नागेश देशमुख (सेलू), नायब तहसीलदार प्रशांत राखे (जिंतूर), तलाठी भीमराव वाकळे,ग्रामपंचायत अधिकारी संतोष कापुरे,बीएलओ पर्यवेक्षक गणहिरे पुरभाजी, केंद्रप्रमुख मयूर जोशी (जोगवाडा), बीएलओ रमेश तरटे, प्रवीण भिसे, शंकर पांचाळ, कोडबळे, तुळशीराम मुळे तसेच यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित नागरिकांना एसआयआर अभियानाचे महत्त्व, प्रगणना फॉर्म भरण्याची प्रक्रिया तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गावातील नागरिकांनीही या अभियानाला सकारात्मक प्रतिसाद देत लोकशाही बळकट करण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक जागरूक नागरिकाने पुढाकार घेऊन जनजागृती करणे ही काळाची गरज असून, अचूक व पारदर्शक मतदारयादी तयार करण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# वसमत रोडवरील उभे असलेल्या कारमधून पैशाची बॅग चोरणाऱ्या पाठलाग करून चोराला पकडले

## नवा मोंढा पोलिसात गुन्हा दाखल

**हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी**

क्राईम वार्ता

**परभणी:** येथील वसमत रोडवर कार मध्ये बसलेल्या व्यक्तीला बोलण्यात गुंतवून गाडीच्या मागच्या सीटवरील ठेवलेली रक्कम असलेली बॅग घेऊन पळ काढला त्याला पकडण्यात यश आले आहे सदरील घटना ही गुरुवार दिनांक 2 जुलै रोजी सायंकाळी सव्वा सातच्या सुमारात वसमत रोड पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर घडली याप्रकरणी दोन जनावर नवामुंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी की दीपक सुरेशराव डफुरे हे मध्यवर्ती बँक पाथरी शाखेत कार्यरत असून दोन जुलै रोजी परभणी येथील मुख्य कार्यालयात बैठक असल्याने परभणी येथे कार सोबत कारचे चालक दीपक उगले हे परभणी येथे आले होते. उशीर असल्याने बँक व्यवस्थापकाचे कारचालक रोहित साळवे यांच्यासोबत पोलीस अधीक्षक कार्यालया शेजारी नाश्ता करण्यासाठी आले होते त्याने कार रस्त्याच्या बाजूला उभी केली होती पुढील सीटवर बसलेले होते तर चालक दीपक उगले रोहित साळवे दोघेजण हॉटेलमध्ये नाश्ता आणण्यासाठी गेले होते. यावेळी एक इसम कार जवळ आला खिडकीची काच वाजवली कार मधील फिर्यादीने काच खाली केली असता संबंधित व्यक्तीने सांगितले तेव्हा फिर्यादीने दरवाजा उघडून पाहत असताना दुसऱ्या एका व्यक्तीने कालच्या मागील सिटी वर ठेवलेली 5000 रुपयाची रोकड असलेलीबॅग घेऊन पळ काढला यावेळी त्याला कारचालक दीपक उगले उरुळी साळवे त्यांनी पाहिले आरडा ओरडा करत त्याचा पाठलाग केला संबंधित आरोपीने निसटून पडण्याचा प्रयत्न करत असताना.त्याला पकडण्यात यश आले रोकड असलेल्या बॅग्स त्याला पोलीस अधीक्षक कार्यालयात समोर गेट जवळ असलेल्या पोलिसांच्या मदतीने नवा मोंढा पोलीस ठाण्यात आणण्यात आले संबंधिताची चौकशी केली असता त्यांनी आपले नाव गौतमराव रविचंद्रन राहणार तामिळनाडू असे सांगितले तर दुसरा साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाला या प्रकरणी संबंधितावर नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डोंबे करत आहेत नाश्ता चालक आले होते.

# घरकुल अनुदान निधीत घोटाळा मुख्याधिकारी व इतर गुन्हा दाखल

### तब्बल दोन कोटी 58 लाखाची फसवणूक

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.**

**परभणी:** येथील लाभार्थ्यांना देय असलेली घरकुल अनुदानाची रक्कम लाभार्थ्या अतिरिक्त इतर खात्यावर अनियमितपणे वर्ग करत तब्बल दोन कोटी ५८ लाख रुपयांचा अपहार करण्यात आला असल्याचे उघडकीस आल्याने याप्रकरणी सोनपेठ नपचे तात्कालीन मुख्याधिकारी व इतरांवर दोन जुलै रोजी सोनपेठ पोलिसात ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाडा तील दक्षता व सुरक्षा वर्गातील सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू महेश चव्हाण यांनी फिर्याद दिली आहे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी अनुदान रक्कम मिळली होती . परंतु म्हाडा ने या रकमेबाबत स्थानिक स्वराज्य संस्थेला निधी ताळमेळ करण्याकरिता बोलावले होते.

१० नोव्हेंबर 2022 ते 1 जुलै 2025 या कालावधीतील बँक स्टेटमेंट ची पाहणी केली असता घरकुल योजनेअंतर्गत 2 कोटी 58 लाख रुपये इतका निधी लाभार्थ्यांना देई असताना सदरचा नीती लाभार्थ्या अतिरिक्त इतर खात्यावर अनियमितपणे वर्ग करण्यात आला. वित्त नियंत्रक माढा यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद सोनपेठ यांना सदर निधी महाडा कडे परत करण्याबाबत कळविले असून आतापर्यंत नगरपरिषदेने कोणतेही उत्तर दिले नाही शासनाचा निधी अपार करत फसवणूक केल्याप्रकरणी गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अशोक गीतेकरत आहेत.

# मराठवाड्यातील अग्निवीरांची सैन्य दलात निवड प्रशिक्षणासाठी 2 हजार 350 अग्निवीर रवाना; भरती प्रक्रियेचा टप्पा यशस्वी पूर्ण

**हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी**



**छत्रपती संभाजीनगर :** आर्मी रिक्रूटिंग कार्यालयाने फेब्रुवारी आणि मार्च २०२६ मध्ये आयोजित केलेल्या भरती मेळाव्यामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना १९ जून ते ०३ जुलै २०२६ या कालावधीत त्यांच्या संबंधित सैन्य प्रशिक्षण केंद्रांकडे रवाना केले आहे.

निवडलेल्या उमेदवारांच्या या गटात तांत्रिक प्रवेशांतर्गत (Technical Entries) सुमारे ६०० उमेदवारांचा समावेश होता, जो भरती प्रक्रियेतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. ही आव्हानात्मक मोहीम 'अग्निव्राज आर्टिलरी ब्रिगेड', विभागीय आयुक्त श्री. श्रीकांत, जिल्हाधिकारी श्री. विनय गौडा जी. सी, पोलीस आयुक्त श्री. प्रवीण पवार आणि भरती मेळाव्याच्या आयोजनाशी संबंधित सर्व शासकीय विभागांच्या सहकार्यातून पूर्ण करण्यात आली.ही भरती प्रक्रिया दररोज सकाळी ०६.०० वाजता सुरू होऊन रात्री उशिरापर्यंत सुरू होती. दिवसभर चाललेल्या या प्रक्रियेत उमेदवारांच्या सर्व आवश्यक गरजांची आणि सुविधांची काळजी घेण्यात आली होती. बायोमेट्रिक पडताळणी, प्रमाणीकरण, कागदपत्रांची छाननी, सामान्य वैद्यकीय तपासणी, बॅचिंग आणि अंतिम रवानगी यांसारख्या प्रक्रिया नियोजित पद्धतीने पार पडल्या, ज्यामुळे प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता, कार्यक्षमता आणि अचूकता सुनिश्चित झाली. हे तरुण अग्निवीर लष्करी प्रशिक्षणाच्या प्रवासाला सुरुवात करत असताना ते राष्ट्राच्या आशा-आकांक्षा आपल्यासोबत घेऊन जात आहेत.

त्यांच्या या प्रवासामुळे मराठवाड्यातील अनेक तरुणांना भविष्यात भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून सामील होण्याची प्रेरणा मिळेल, असे आर्मी रिक्रूटिंग कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने कळविले आहे.

# मुख्यमंत्री चषक युवा बास्केटबॉल स्पर्धा आजपासून 9 जुलैपर्यंत रंगणार थरार

**छत्रपती संभाजीनगर:** युवा बास्केटबॉलपटूंसाठी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी मुख्यमंत्री चषक ४१ वी राज्यस्तरीय युवा गट बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धा यंदा प्रथमच छत्रपती संभाजीनगर शहरात आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशनच्या वतीने, छत्रपती संभाजीनगर जिल्हा व तालुका बास्केटबॉल असोसिएशन, एम.एस.एम. बास्केटबॉल स्पोर्ट्स असोसिएशन आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा ४ ते ९ जुलै २०२६ या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत आयोजन समितीच्या वतीने देण्यात आली. याप्रसंगी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेत राज्यभरातील ३६ मुलांचे आणि ३१ मुलींचे जिल्हा संघ सहभागी होणार असून, एकूण ८०४ खेळाडू आणि २४० अधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे राज्यातील सर्वोत्तम युवा बास्केटबॉलपटूंचा थरारक खेळ पाहण्याची संधी क्रीडाप्रेमींना मिळणार आहे. या स्पर्धेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आगामी राष्ट्रीय युवा बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या मुलांच्या आणि मुलींच्या संघांची निवड याच स्पर्धेतून करण्यात येणार आहे. त्यामुळे युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी हे महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धेतील सामने एक इनडोअर आणि तीन आऊटडोअर कोर्टवर खेळविण्यात येणार आहेत.



खुलताबाद नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्य अधिकारी समीर शेख यांची आज कामानिमित्त सदिच्छा भेट . दैनिक हिंदू प्रकाश वार्ता छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी संतोष पाटील करपे माजी नगरसेवक जुबेर लाला.

## माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचा सत्कार करताना गुलाबराव पाटील कोलते

**सावळदबारा प्रतिनिधी :**



दि. 2 जुलै रोजी सिल्लोड येथे भारतीय जनता पार्टीचे कार्यालयाचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. सिल्लोड येथे आले असतात माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची भेट घेऊन भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा मुस्लिम समाजाच्या राज्यस्तरीय अभ्यास समितीचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) इद्रिस मुलतानी, विधान परिषद आमदार सुहास शिरसाठ,भाजपचे प्रदेश चिटणीस सुरेश पाटील बनकर, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील मोठे यांची उपस्थिती होती.

तसेच तालुकाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे, सभापती उत्तम चव्हाण, पंचायत समिती सदस्य राहुल राठोड, जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, जयप्रकाश चव्हाण, सिताराम जाधव, संभाजी पवार, लवकेश जाधव, आदी उपस्थित होते.

## एसबीआय एटीएम शो पीस; ग्राहकांची रोजची फरफट!

**जिंतूर | प्रतिनिधी :** जिंतूर शहरातील **भारतीय स्टेट बँक (एसबीआय)**चे एटीएम वारंवार बंद राहत असल्याने ग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा एटीएममध्ये रोख रक्कम उपलब्ध नसते, तर सुरक्षा रक्षकही अनुपस्थित असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.




रोख रक्कम काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत असून, इतर बँकांच्या एटीएमचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे वेळ आणि पैशांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

एटीएम सेवा सुरळीत ठेवणे, नियमितपणे रोख रक्कम उपलब्ध करून देणे आणि सुरक्षा व्यवस्थाही सक्षम करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून ही समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## खुलताबाद नगर परिषदेचे लेखापाल जय किशन दळवी यांची फुलंब्री येथे बदली

**दैनिक प्रकाश वार्ता/ जिल्हा प्रतिनिधी**




छत्रपती संभाजी नगर खुलताबाद नगर परिषदेचे लेखपाल जय किशन दळवी यांचे नुकतीच फुलंब्री नगर पंचायत येथे बदली झाल्यामुळे खुलताबाद नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर शेख कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे व सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार व मानचिन्ह देऊन गौरव करून निरोप देण्यात आला

खुलताबाद नगरपरिषद येथून आपल्या शासकीय सेवेची लेक पाल या पदाची सुरुवात करून प्रामाणिकपणाने आपली जबाबदारी पार पाडणारे लेखापाल जय किशन दळवी यांच्या बदलीच्या निमित्ताने सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने निरोप समारंभा च्या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना कर्मचाऱ्यांनी आपल्या शासकीय सेवेत आपल्या कामाशी जबाबदारीशी एकनिष्ठ असले पाहिजे अशी भावना आपल्या मनोगतातून शेख समीर मुख्याधिकारी नगरपरिषद खुलताबाद यांनी व्यक्त केली.

(छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त कार्यालयातून नव्याने लेखापाल म्हणून खुलताबाद नगरपरिषद कार्यालय येथे नव्याने रुजू झालेल्या सुभाष चव्हाण यांची उपस्थिती होती ) या प्रसंगी नगरपरिषद कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे. पाणीपुरवठा इंजिनियर श्रीहरी चौडेकर लेखा अधिकारी किशोर मोरे बांधकाम विभागाचे इंजिनियर ऋषिकेश जोशी स्वच्छता निरीक्षक हरिहर चांदवाडे अंकुश भराड पाटील जितेंद्र बोचरे. श्रीमती अश्विनी नंद. मनीषा लघाने अशोक भंडारी आप्पाराव देवकर शेख आतिक गणेश रोटे ऋषिकेश सोनवणे. सतीश भालेराव भानुदास सोनवणे संतोष आव्हाड सुखदेव घुसाळे इरफान मामू नितीन गोल्हार शुभम देवकर राहुल कांबळे काशिम बेग लक्ष्मण शेजुळ अनिल फुलारे यांच्यासह सर्व नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते

## शिवना केंद्राचे नवनियुक्त केंद्रप्रमुख श्री सावळे सर यांचा जाहीर सत्कार



**शिवना, दि. ३ जुलै :** शिवना केंद्राचे नवनियुक्त केंद्रप्रमुख श्री सावळे सर यांचा आज शिवना केंद्रातील शिक्षकांच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवना केंद्राचे माजी केंद्रप्रमुख भोंबे सर, केंद्रीय मुख्याध्यापक रोहिले सर, पाटिल सर, कुरैशी कलीम सर, शकील अहेमद सर, भूषण पाटील सर, परवेझ सर, मोहम्मद सादी सर तसेच झिने सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन श्री सावळे सर यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सावळे सर यांचे अभिनंदन करून त्यांच्या नवीन जबाबदारीबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली शिवना केंद्रातील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शिक्षकांमधील समन्वय अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी श्री सावळे सर यांनी सर्वांचे आभार मानत केंद्रातील सर्व शिक्षकांच्या सहकार्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक प्रगती आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांना प्राधान्य देऊन शिवना केंद्राला प्रगतिपथावर नेण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमास केंद्रातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात संपन्न झाला.

## जिल्हाधिकारी कार्यालया परिसरात वृक्षलागवड मोहिमेला प्रारंभ

**हिंगोली : हिंगोली :** पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि हरित क्षेत्रात वाढ करण्याच्या उद्देशाने 'एक पेड माँ के नाम 2.0' अभियान तसेच वन महोत्सवानिमित्त शुक्रवार, (दि.३) रोजी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वृक्षारोपण करून जिल्ह्यातील वृक्षलागवड मोहिमेला प्रारंभ झाला. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते वड, पिंपळ व उंबर या देशी वृक्षांच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी विभागीय वन अधिकारी श्रीमती पुष्पा पवार, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



याप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षलागवडीबरोबरच वृक्षांचे संगोपन करणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. वृक्ष हे पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच भावी पिढ्यांना निरोगी व सुरक्षित जीवन देणारे महत्त्वपूर्ण साधन असल्याचे त्यांनी नमूद केले. 'एक पेड माँ के नाम 2.0' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या मातृऋणाची जाणीव ठेवून किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

वन महोत्सवानिमित्त भारतीय देशी प्रजातींच्या वड, पिंपळ व उंबर या पर्यावरणपूरक आणि दीर्घायुषी वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणासोबतच त्यांचे संवर्धन व जतन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

या कार्यक्रमास सामाजिक वनीकरण विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी संदीप शिंदे, वनपाल संदीप वाघ, गोपाल बिरसोने, वनरक्षक बालाजी जाधव, सूरज शेळके, श्रीमती सुनीता लोणे, देवराव दिपके, तुषार भालेराव, शाहू भालेराव यांच्यासह सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील वृक्षलागवड मोहिमेअंतर्गत विविध शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायती तसेच सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात येणार असून, या अभियानात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

## राष्ट्रीय जलतरण साक्षरता मिशनअंतर्गत राहुल टेकाळे यांची प्रमुख सल्लागारपदी नियुक्ती

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय जलतरण साक्षरता मिशनअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या जलतरण साक्षरता समिती, छत्रपती संभाजीनगरच्या कार्यकारिणीवर राहुल टेकाळे यांची प्रमुख सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष रविंद्र प्रभाकरराव निकम यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. जागतिक जलतरण साक्षरता दिनानिमित्त १५ जून रोजी झालेल्या समितीच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. जिल्ह्यात जलतरण साक्षरता चळवळ अधिक व्यापक व प्रभावी करण्याबरोबरच पाण्यात बुडून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी जनजागृती करणे, तसेच सर्व वयोगटातील नागरिकांना जलतरणाचे प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, या उद्देशाने समिती विविध उपक्रम राबविणार आहे. "जल हे जीवन आहे, ते मृत्यूचे कारण ठरू नये" या ब्रीदवाक्यानुसार 'केजी ते पीजी' प्रत्येक नागरिकाला जलतरण साक्षर करण्याचे ध्येय समितीने निश्चित केले आहे. यासाठी प्रशिक्षण शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर विशेष भर दिला जाणार आहे. राहुल टेकाळे यांची सामाजिक कार्यातील सक्रियता, विविध क्षेत्रांतील अनुभव आणि जलतरण साक्षरतेबाबतची बांधिलकी लक्षात घेऊन त्यांची प्रमुख सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आल्याचे अध्यक्ष रविंद्र प्रभाकरराव निकम यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्हा शंभर टक्के जलतरण साक्षर करण्याच्या अभियानाला निश्चितच गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## जिल्हा परिषद पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

### पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या दुरुस्तीसह लंपी लसीकरण, चारा बियाणे व दुग्धविकास योजनांचा आढावा

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीची मासिक सभा शुक्रवारी (दि. ३) सकाळी १०.३० वाजता जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा समितीचे सभापती जितेंद्र जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात पार पडली. बैठकीत जिल्ह्यातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सभेला समिती सदस्य पांडुरंग औटे, राधाकृष्ण काकडे, लंकाबाई जाधव, वंदना शिंदे, सुनिता खंडागळे, स्वाती पाटेकर, जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) नानासाहेब कदम तसेच विभागातील सर्व अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनी जनावरांच्या उपचारासाठी आवश्यक असलेली एक्स-रे मशीन, जनावरे पकडण्यासाठी सापळे तसेच अपघातग्रस्त व आजारी जनावरे सुरक्षितपणे हलविण्यासाठी क्रेन उपलब्ध करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. याशिवाय जिल्ह्यातील दुरवस्थेत असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा आढावा घेऊन त्यांची दुरुस्ती, आवश्यक सुविधा उपलब्ध करून दवाखाने सुस्थितीत आणण्यावर भर देण्यात आला.

यावेळी वैरण विकास योजनेअंतर्गत चारा बियाणे वाटप, लंपी रोग प्रतिबंधक लसीकरण मोहीम, जनावरांसाठी औषधांचा पुरेसा साठा आणि उपलब्धता याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच विदर्भ–मराठवाडा दूध विकास मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहितीही सदस्यांना देण्यात आली.

जिल्ह्यातील पशुपालकांना दर्जेदार सेवा, सक्षम पशुवैद्यकीय सुविधा आणि शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा, यासाठी संबंधित विभागाने नियोजनबद्ध व प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

## नविन रास्तभाव दुकानांसाठी अर्ज मागविले

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामिण येथे नवीन रास्त भाव दुकान मंजूर करण्यासंदर्भात जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला असून पंचायत, गट संस्था यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले आहेत, असे तहसिलदार व अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी कळविले आहे. शहर हद्दीतील मौजे सावित्रीनगर चिकलठाणा व ग्रामिण हद्दीत बजाजनगर लोकमान्य चौक येथे एककांमध्ये वाढ झाल्यामुळे नवीन रास्तभाव दुकान मंजूर करण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुक संस्थांनी दि.३१ जुलै पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावे,असे आवाहन तहसिलदार व अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे (6 जुलै रोजी) जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन

**हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा 'जिल्हास्तरीय लोकशाही दिन' सोमवार, दिनांक ६ जुलै रोजी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १२ वाजता हा लोकशाही दिन पार पडणार असल्याची माहिती सामान्य प्रशासनाच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती संगीता राठोड यांनी दिली आहे. लोकशाही दिना सहभागी होणाऱ्या नागरिकांचे अर्ज सकाळी ११ ते १२ या वेळेतच स्वीकारले जातील.तक्रार वैयक्तिक असावी आणि अर्ज विहित नमुन्यात असणे अनिवार्य आहे. यापूर्वी तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दिला असल्यास, त्याची पोहोच पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक बाबी, यापूर्वी लोकशाही दिनात दाखल केलेले अर्ज यात स्वीकारले जाणार नाही असे सुचित केले आहे. नागरिकांना लोकशाही दिनाचा लाभ घेण्यासाठी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## तृतीयपंथीयांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व स्वयंरोजगार तर व्यवसायासाठी बीज भांडवल योजना

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** तृतीयपंथीयांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणासाठीची केंद्रीय क्षेत्र योजना अंतर्गत 'Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise (SMILE)' या छत्र योजनेंतर्गत तृतीयपंथी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती उपयोजनेचा समावेश केला असून ही योजना केंद्र शासनाच्या **https:**//transgender.dosje.gov.in या राष्ट्रीय पोर्टलवरून राबविण्यात येत आहे.

शासनमान्य किंवा खासगी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये इयत्ता ०९ वी ते पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. विद्यार्थी भारताचा नागरीक असावा व त्यांच्याकडे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या तृतीयपंथी व्यक्तींसाठीच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी करण्यात आलेले तृतीयपंथी ओळख प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने **https:**//transgender.dosje.gov.in या राष्ट्रीय पोर्टलवर रजिस्ट्रेशन करून ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्त्यांची संख्या मर्यादित असल्याने लाभार्थ्यांची निवड मागील शैक्षणिक वर्षातील गुणांच्या आधारे करण्यात येईल. तथापि विद्यार्थी केंद्र किंवा राज्य शासन पुरस्कृत इतर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेत असेल, तर त्यास सदर शिष्यवृत्ती देय राहणार नाही. मॅट्रिकपूर्व (Pre-Matric) व मॅट्रिकोत्तर (Post-Matric) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु. १३,५००/- इतकी शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहिल. विद्यार्थ्यांचे आधार संलग्न (Aadhaar Linked) बँक खाते असावे.

तसेच, राज्यातील तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देवून त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास घडवून आणण्यासाठी बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील किमान दहा वर्ष वास्तव्य असलेल्या अप्रशिक्षित तृतीयपंथीय व्यक्तींना २१ प्रकारच्या लघु व्यवसायांसाठी तसेच त्याव्यतिरिक्त १२ प्रकारच्या व्यवसायांसाठी प्रशिक्षित असल्यास किंवा अप्रशिक्षित तृतीयपंथीय व्यक्तींना व्यवसायाचे प्रशिक्षण देवून आवश्यक साधने संच (Tool Kit) साठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत अर्जदार महाराष्ट्र राज्याचा किमान १० वर्ष रहिवासी असावा व त्यांच्याकडे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या तृतीयपंथी व्यक्तींसाठीच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी करण्यात आलेले तृतीयपंथी ओळख प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. लाभार्थी हा १८ ते ५० वयोगटातील व्यवसाय करण्यास सक्षम असावा. सदर योजनेंतर्गत लघु कर्ज योजना (रु. २५,०००/- पर्यंत), मध्यम कर्ज योजना (रु. ५०,०००/- पर्यंत) व दिर्घ कर्ज योजना (रु. २,००,०००/- पर्यंत) यापैकी कोणतेही एक कर्ज अनुज्ञेय राहिल. सदर योजनेंतर्गत लाभार्थी हिस्सा ५ टक्के असून, ४५ टक्के शासन अनुदान व ५० टक्के राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

लाभार्थ्याने व्यवसायासाठीचा परवाना, व्यवसायासाठी लागणारी सामुग्री, यंत्र सामुग्री इत्यादी कोटेशन, बिले, जागेचा ७/१२ किंवा जागा भाड्याची असल्यास भाडेकरारनामा, व्यवसाय करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी सादर करणे आवश्यक आहे. लाभार्थ्याने शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, परभणी यांचेकडे सादर करावे. सदर योजनेंतर्गत नियमित कर्ज फेडणाऱ्या लाभार्थ्यास व्याजावर ३ टक्के रिबेट (सुट) देण्यात येईल. इच्छुक लाभार्थ्यांनी योजनांच्या अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, परभणी जिल्हा यांचेकडे संपर्क साधावा, आवाहन सहायक आयुक्त राजु एडके यांनी केले आहे.

## आरोग्य सेवेत कट प्रॅक्टिस व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही. सा आ मंत्री -प्रकाश आबिटकर

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**

**परभणी :** राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, पारदर्शक आणि तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करावे. रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविणे, कट प्रॅक्टिसला प्रोत्साहन देणे किंवा शासकीय यंत्रणेतील उपलब्ध सुविधांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, ईएमएस समन्वयक आणि कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित या बैठकीसाठी आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ईएमएस समन्वयक तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आरोग्य मंत्री पुढे म्हणाले की, राज्यातील १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय रुग्णालयात किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांमध्ये पाठविल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या सर्व प्रकरणाचा मागील सहा महिन्यांचा रेफरल डेटा तपासण्यात यावा. ज्या ठिकाणी अनियमितता आढळेल, तेथे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे.रुग्णाला अनावश्यकपणे खासगी रुग्णालयात पाठविले जात असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. याबाबत सर्व जिल्ह्यांनी सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर करावा.

राज्यातील प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध राहावी, यासाठी नियमित आणि प्रभावी देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले. शासनाने आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही कामामध्ये दिरंगाई अथवा निष्काळजीपणा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

'आरोग्य संवाद यात्रा'च्या माध्यमातून १५ जुन पासून राज्यभर प्रत्यक्ष पाहणी मोहीम राबविण्यात येत असून, उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये तसेच गावपातळीवरील आरोग्य समित्यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींसाठी संबंधित यंत्रणेला जबाबदार धरले जाईल. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने या योजनेच्या अंमलबजावणीला गती द्यावी.

गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय स्तरावरील सर्व आरोग्य समित्या अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देताना कालबाह्य समित्या कायम ठेवण्याचा प्रकार अजिबात सहन केला जाणार नाही असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. समित्यांमध्ये विद्यमान सरपंच व सदस्यांचा समावेश करून त्यांचे नियमित कामकाज सुरू ठेवणे ही संबंधित जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे.

दर तीन महिन्यांनी आमदारांच्या उपस्थितीत होणाऱ्या जिल्हास्तरीयñ आरोग्य आढावा बैठकींना सिव्हिल सर्जन आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत लोकप्रतिनिधींमार्फत स्थानिक आरोग्य सेवांच्या गरजा, समस्या आणि अपेक्षा थेट प्रशासनापर्यंत पोहोचतील. या बैठकींचे इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येणार असून त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

आरोग्य सेवेमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देत राज्यातील प्रत्येक नागरिकाला विश्वासार्ह आणि सक्षम शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणेने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी केले

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# हर्सूल भागात सेवानिवृत्त वृद्धावर भररस्त्यात चाकूने जीवघेणा हल्ला; पूर्वनियोजित कटाचा संशय

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील हर्सूल परिसरातील अमरनाथ हौसिंग सोसायटीजवळ एक खळबळजनक घटना समोर आली आहे. गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास एका ६५ वर्षीय सेवानिवृत्त व्यक्तीचा दुचाकीवरून पाठलाग करून, त्यांना रस्त्यात अडवून चाकूने पाठीवर वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. पूर्वनियोजित कट रचून हा हल्ला करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी दत्तात्रय पांडुरंग ठोंबरे (वय ६५, रा. अमरनाथ हौसिंग सोसायटी, हर्सूल) यांनी दिलेल्या जबाबावरून हर्सूल पोलीस ठाण्यात तीन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी दत्तात्रय ठोंबरे हे सेवानिवृत्त असून गुरुवारी संध्याकाळी ते सिडको येथील सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) कार्यालयातील आपले काम आटोपून दुचाकीने घरी परतत होते. संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास त्यांच्या घराच्या जवळच रस्त्यावर चिखल असल्याने त्यांनी दुचाकीचा वेग कमी केला.याच संधीचा फायदा घेऊन एकाच मोटारसायकलवर आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी ठोंबरे यांना ओव्हरटेक करून आपली गाडी त्यांच्या समोर आडवी लावली. गाडी थांबताच त्यातील दोघेजण खाली उतरले. त्यापैकी एका विस्कटलेल्या केसांच्या (झिकऱ्या केसांच्या) इसमाने काहीही न बोलता थेट हातातील चाकूने ठोंबरे यांच्या पाठीवर जोरात वार केला.हल्ल्यानंतर ठोंबरे हे गंभीर जखमी झाले. आजूबाजूला कोणीही नसल्याचा फायदा घेऊन हल्लेखोर दुचाकीवरून फरार झाले. अशाही अत्यंत गंभीर परिस्थितीत ठोंबरे यांनी तातडीने त्यांचा मुलगा आशिष ठोंबरे आणि पोलीस ठाण्यातील परिचित कोलते मॅडम यांना फोन करून घटनेची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून हर्सूल पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (PI) स्वाती केदार यांनी तात्काळ पथकासह घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी ठोंबरे यांना पोलीस गाडीत घालून तातडीने 'घाटी' रुग्णालयाच्या अपघात विभागात दाखल केले. सध्या त्यांच्यावर घाटी रुग्णालयातील वार्ड क्रमांक १४ मध्ये उपचार सुरू आहेत.या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी हर्सूल पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम १०९ (जीवे मारण्याचा प्रयत्न), ६१ (गुन्हेगारी कट रचणे) आणि ३(५) (सामूहिक उद्देश) अन्वये गुन्हा दाखल केला आहे."माझा कोणाशीही वाद नव्हता,

# पहिले समजावले, नंतर कारवाई! रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर आयुक्तांचा धडक ॲक्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांनी सकाळच्या नियमित जॉगिंगदरम्यान शहरातील स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाची अचानक पाहणी केली. यावेळी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकाला त्यांनी प्रथम कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगत घरातील कचरा ओला, सुका, घरगुती घातक आणि सॅनिटरी अशा चार प्रकारांत वर्गीकरण करूनच महानगरपालिकेच्या घंटागाडीत देण्याचे आवाहन केले.

समज देऊनही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याप्रकरणी संबंधित नागरिकावर आयुक्तांच्या आदेशानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली. झोन क्रमांक ५ च्या पथकाने 'क्लीन स्ट्रीट ॲप'च्या माध्यमातून ब्रिजवाडी चौक ते उत्तरानगरी, एमआयडीसी चिकलठाणा परिसरात कारवाई करत तीन हजारांचा दंड वसूल केला.

पाहणीदरम्यान एक कर्मचारी धूम्रपान करताना आढळून आल्याने त्यालाही समज देण्यात आली. सार्वजनिक सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांनी धूम्रपान करू नये, असे स्पष्ट करत सुधारणा करण्याच्या उद्देशाने संबंधित कर्मचाऱ्यास नोटीस बजावण्यात आली.

यावेळी आयुक्तांनी शहरातील स्वच्छता व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन, घंटागाड्यांमधील वर्गीकृत कचऱ्याचे संकलन याची सविस्तर पाहणी केली. तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी, आयईसी (IEC) पथक आणि घंटागाडी कर्मचाऱ्यांना प्रभावी जनजागृती, शंभर टक्के कचरा संकलन आणि शंभर टक्के कचरा वर्गीकरण सुनिश्चित करण्याच्या सूचना दिल्या.

महानगरपालिकेने नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याचे तसेच घरातील कचरा चार प्रकारांत वर्गीकृत करूनच घंटागाडीत देण्याचे आवाहन केले असून, 'स्वच्छ, सुंदर, हरित छत्रपती संभाजीनगर' अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे.

# राज्य कर्करोग संस्थेत पेट-सीटी स्कॅन सेवेचा श्रीगणेशा

## अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते लोकार्पण; मराठवाड्यातील कर्करोग रुग्णांना मोठा दिलासा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** राज्य कर्करोग संस्था अर्थात शासकीय कर्करोग रुग्णालयात अत्याधुनिक पेट-सीटी स्कॅन (PET-CT Scan) सेवेचा शुभारंभ अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते करण्यात आला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही सुविधा प्रत्यक्षात सुरू झाल्याने छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील हजारो कर्करोग रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांनी पेट-सीटी स्कॅन सेवा सुरू होण्यामागील पाठपुराव्याची माहिती दिली. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी या सुविधेमुळे रुग्णांना कमी खर्चात आणि वेळेत तपासणी उपलब्ध होणार असल्याचे सांगत, गरजू रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास डॉ. अंजली वासडीकर, डॉ. अर्चना राठोड-पवार, डॉ. इशरत करीम, डॉ. प्रभाकर जिरवणकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दर्पण जक्कल, डॉ. बालाजी शेवाळकर, डॉ. अजय बोराळकर, डॉ. आदिती लिंगायत, डॉ. भक्ती कल्याणकर, डॉ. नरेंद्र पाटील, प्रशासकीय अधिकारी डॉ. किशोर सुलाने, मणिपाल हेल्थचे डॉ. शुभम काळे, प्रविणा मोरे तसेच अधिसेविका मंदाकिनी ठोकळ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अधिपरिचारिका मंजुषा नागमोते यांनी केले. यापूर्वी कर्करोग रुग्णांना पेट-सीटी स्कॅनसाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे मोठा आर्थिक भार पडत होता आणि तपासणीसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने उपचारांनाही विलंब होत होता. आता ही सुविधा शासकीय रुग्णालयातच उपलब्ध झाल्याने कमी खर्चात, सुलभ आणि वेळेत तपासणी होणार आहे. यासाठी रुग्णालयाच्या परिसरातील जुन्या नेत्र रुग्णालयाच्या इमारतीत

**"पेट-सीटी स्कॅन सेवा सुरू झाल्यामुळे कर्करोग रुग्णांना कमी खर्चात, वेळेत आणि दर्जेदार तपासणीची सुविधा उपलब्ध होणार आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा."**
**- डॉ. शिवाजी सुक्रे**
**(अधिष्ठाता)**

अत्याधुनिक केंद्र उभारण्यात आले आहे.

पेट-सीटी स्कॅन म्हणजे काय?

पेट-सीटी (Positron Emission Tomography–Computed Tomography) ही कर्करोगाच्या निदानासाठी वापरली जाणारी अत्याधुनिक तपासणी आहे. रेडिओॲक्टिव्ह ट्रेसरच्या साहाय्याने शरीरातील कर्करोगग्रस्त पेशींचे स्थान, प्रसार आणि हालचाल अचूकपणे ओळखता येते. त्यामुळे उपचारांचा परिणाम आणि

**पेट-सीटी स्कॅन ही कर्करोगाचे अचूक निदान, रोगाची व्याप्ती, उपचारांचा परिणाम आणि पुढील उपचारांचे नियोजन निश्चित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची तपासणी मानली जाते. या सेवेच्या प्रारंभामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.**

**"पेट-सीटी स्कॅन सेवा सुरू करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अनेक वर्षांपासूनची रुग्णांची गरज पूर्ण झाली असून, ही सुविधा मराठवाड्यातील कर्करोग उपचार व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे."**
**- डॉ. अरविंद गायकवाड**
**(विशेष कार्य अधिकारी)**

पुढील उपचारांची दिशा निश्चित करण्यास डॉक्टरांना मोठी मदत होते.

# एआयमुळे धोके कमी, फायदा अधिक; रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील : सीए अशोक पाटील

## सीए दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर गोल्डतर्फे गौरव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे तंत्रज्ञान मानवी कामकाज अधिक सुलभ करणारे असून, त्याचा योग्य वापर केल्यास धोके कमी आणि फायदे अधिक आहेत. भविष्यात एआयमुळे बेरोजगारी वाढणार नसून, उलट विविध क्षेत्रांत रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ सनदी लेखापाल सीए अशोक पाटील यांनी केले.

'सीए दिना'निमित्त लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर गोल्डच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात सीए अशोक पाटील यांचा सन्मान करण्यात आला. सन्मानाला उत्तर देताना त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान आणि आर्थिक क्षेत्रातील बदलांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

सीए पाटील म्हणाले की, व्यवसाय, लेखापरीक्षण आणि आर्थिक व्यवस्थापनात एआयच्या वापरामुळे अचूकता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढत आहे. मात्र, एआय हे मानवी बुद्धिमत्ता आणि अनुभवाला पर्याय नसून, ते मानवी कौशल्य अधिक सक्षम करणारे प्रभावी साधन आहे. त्यामुळे नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना सातत्याने कौशल्यविकास करणे ही काळाची गरज आहे.

यावेळी डॉ. पी. वाय. मुळे आणि सीए अमोल गोधा यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास लायन्स क्लबचे अध्यक्ष आशिष छाबडा, सचिव सुनील पांडे, कोषाध्यक्ष राजेंद्र ठोले, उपाध्यक्ष सुबोध जाधव, झोन चेअरपर्सन मनोज अंभोरे, राहुल दाशरथे, अभिजीत हिरप यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी लायन्स क्लबच्या वतीने सीए अशोक पाटील यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# 'माहिती अधिकार नियम- 2026' ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून स्थगिती

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजी नगर :** राज्य शासनाने नुकत्याच लागू केलेल्या 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६' ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार तात्काळ स्थगिती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे नवीन नियमांमधील जाचक अटी आणि वाढीव शुल्काच्या त्रासातून माहिती अधिकार कार्यकर्त्यांना सध्या मोठा दिलासा मिळाला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २७ (२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने १२ जून २०२६ रोजीच्या शासन राजपत्रात हे नवीन नियम प्रसिद्ध केले होते. मात्र, आता मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर राज्य माहिती आयोगाचे सचिव रविराज फल्ले यांनी २ जुलै २०२६ रोजी अधिकृत पत्रक जारी केले आहे. या पत्रकानुसार, मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर येथील राज्य माहिती आयोगाच्या आयुक्तांना या स्थगितीबाबत कळवण्यात आले असून, महसूल विभागाच्या अंतर्गत येणारी सर्व शासकीय कार्यालये व सार्वजनिक प्राधिकरणांच्या हे निदर्शनास आणून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. माहिती अधिकार नियम, २०२६ लागू झाल्यानंतर अर्ज प्रक्रियेत मोठे बदल आणि शुल्कवाढ करण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांच्या स्थगितीच्या निर्णयामुळे खालील अटींना सध्या ब्रेक लागला आहे. नवीन स्वरूपातील अटी आणि वाढीव आर्थिक भार यामुळे माहिती अधिकार कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी होती. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या नियमांना स्थगिती दिल्याने आरटीआय (RTI) कार्यकर्त्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

माहिती अधिकारी नियम 2026

**अर्ज करण्याचे प्रयोजन:** माहिती मागण्यामागचे नेमके कारण (प्रयोजन) स्पष्ट करणे बंधनकारक करण्यात आले होते.

# टू-व्हिलर मेकॅनिक संघटनेचा सामाजिक उपक्रम; कर्करोग रुग्णालयातील 80 हून अधिक साहित्याची दुरुस्ती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी





**छत्रपती संभाजीनगर :** औरंगाबाद टू-व्हिलर मेकॅनिक संघटनेच्या वतीने आमखास मैदान येथील शासकीय कर्करोग रुग्णालय तसेच मेडिसिन विभागातील वॉर्ड क्रमांक ८ येथे विविध वैद्यकीय साहित्याची मोफत दुरुस्ती करण्यात आली. वेल्डिंग व नट-बोल्टच्या साहाय्याने रुग्णालयातील खराब झालेल्या साहित्याची दुरुस्ती करून रुग्णसेवेला हातभार लावण्यात आला.

कर्करोग रुग्णालयात २८ टूल, २१ खुर्च्या, ३ चेंजिंग स्टँड, ४ स्ट्रेचर, २ व्हीलचेअर आणि ४ आयसीयू पेशंट बेडची दुरुस्ती करण्यात आली. तसेच मेडिसिन विभागाच्या वॉर्ड क्रमांक ८ मध्ये ५ व्हीलचेअर, ४ खुर्च्या, १ चेंजिंग स्टँड, २ सलाईन स्टँड, १ ऑक्सिजन स्टँड, १ स्ट्रेचर, ३ पेशंट बेड तसेच ११ सलाईन स्टँडचे वेल्डिंग करून आवश्यक दुरुस्ती करण्यात आली.

या उपक्रमात औरंगाबाद टू-व्हिलर मेकॅनिक संघटनेचे अध्यक्ष गफ्फार पटेल, बिडकीन मेकॅनिक संघटनेचे विभाग प्रमुख जावेद पटेल, फारुक पटेल, मतीन बेग, शेख नवाब, सय्यद आसेफ, शेख दानिश, सिल्लोड मेकॅनिक संघटनेचे अध्यक्ष शेख शाकेरभाई, उपाध्यक्ष सचिन आरके, राहुल सोमासे, शेख अश्फाक बेग, विभाग प्रमुख अमान पठाण यांनी सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष राम पारखे, जिल्हा उपाध्यक्ष मुन्नाभाई, जिल्हा उपाध्यक्ष शेख नूरभाई, विभाग प्रमुख सरवर खान तसेच संस्थापक अध्यक्ष सय्यद चांद यांनीही या सामाजिक उपक्रमात योगदान दिले.


रुग्णालयातील वैद्यकीय साहित्य कार्यक्षम झाल्याने रुग्ण व रुग्णालय प्रशासनाला मोठा दिलासा मिळाला असून, संघटनेच्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# मुसळधार पावसामुळे उरण व द्रोणागिरी रेल्वे स्टेशन जलमय

## रेल्वे प्रशासनाच्या निष्काळजीपणाविरोधात नागरिकांचा तीव्र संताप

दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी





**उरण /रायगड :** गेल्या दोन ते तीन दिवसांपासून उरण तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मात्र, उरण व द्रोणागिरी रेल्वे स्टेशन परिसरात साचलेल्या पाण्यामुळे रेल्वे प्रशासनाच्या बेजबाबदारपणा, निष्काळजीपणा आणि ढिसाळ नियोजनाचे पुन्हा एकदा दर्शन घडल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

स्टेशन परिसरातील जिने, पायऱ्या आणि प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पाण्याचा निचरा करण्यासाठी कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याने रेल्वे प्रशासनाचा कारभार केवळ कागदोपत्री असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

उरण परिसरात रेड अलर्ट असतानाही स्टेशन परिसरात पाणी साचण्याची समस्या कायम राहिल्याने प्रशासनाच्या दाव्यांची पोलखोल झाली आहे. प्रत्येक पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत असताना कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात रेल्वे प्रशासनाला अपयश आले असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेशी सर्रास खेळ केला जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, हजारो प्रवासी दररोज या मार्गावरून प्रवास करत असताना त्यांच्या जीविताची कोणतीही पर्वा नसल्याचे चित्र दिसत आहे. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना पाण्यातून मार्ग काढत रेल्वेत चढावे लागत असून, एखादा अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

स्थानिक नागरिकांनी रेल्वे प्रशासनाला तातडीने जागे होण्याचे आवाहन करत स्टेशन परिसरातील पाणी निचऱ्याची सक्षम व्यवस्था करावी, दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# विकसित भारत 'जी रामजी' अभियानाचा लोणी बुद्रुक व तीडी येथे शुभारंभ

## जि.प.अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते प्रारंभ; आमदार प्रा. रमेश बोरनारे यांची प्रमुख उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** वैजापूर तालुक्यातील लोणी बुद्रुक आणि तीडी ग्रामपंचायतीमध्ये विकसित भारत 'जी रामजी' अभियानाचा शुभारंभ जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार प्रा. रमेश बोरनारे, वैजापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मनरेगा विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात पूर्वीच्या रोजगार हमी (मनरेगा) कायदा २०२५चे नामकरण विकसित भारत 'जी रामजी' कायदा २०२५ असे करण्यात आल्यानंतर त्यातील उद्दिष्टे, वैशिष्ट्ये आणि बदलांविषयी ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्ञानदेव जायभाये यांनी नव्या कायद्याची सविस्तर माहिती देत विविध तरतुदींचे मार्गदर्शन केले.

यावेळी रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूर म्हणून कार्यरत असलेल्या कामगारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच वृक्षारोपण करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. १ जुलै २०२६ पासून या योजनेची देशभरात अंमलबजावणी सुरू झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे, दीपक राजपूत, सभापती वंदना बाळू शिंदे, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, विविध पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911